# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२३७१० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र- ११८ दिनांक :- ०१/०९/२०२६

**" जळगाव शहर पोलीस ठाणे हद्दीतील चोरीचा गुन्हा ५ तासांत उघडकीस गुन्हे शोध पथकाची तत्पर कारवाई; तिघे ताब्यात, १२,०००/- रुपये हस्तगत "**

===०००===

दिनांक २६/०८/२०२६ रोजी दुपारी ०३.०० ते ०४.३० वाजेच्या दरम्यान, जळगाव शहरातील शाहूनगर परिसरातील शाहू कॉम्प्लेक्स येथे फिर्यादी अनिल राजमल कासट, वय ६२ वर्षे, व्यवसाय मॅनेजर (महेश प्रगती मंडळ) व दूध विक्रेता, रा. १७६, एम.आय.डी.सी., म्हाडा कॉलनी, जळगाव यांच्या पॅन्टच्या खिशातील १२,५००/- रुपये रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती. याबाबत फिर्यादी यांनी **जळगाव शहर पोलीस ठाणे येथे सीसीटीएनएस गुन्हा क्र. ३३५/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला होता.**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन **मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे** यांनी जळगांव शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. सागर शिंपी यांना सदर गुन्ह्याचा तात्काळ तपास करून आरोपींचा शोध घेण्याबाबत तसेच गुन्ह्यातील **मुद्देमाल** हस्तगत करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन व सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. सागर शिंपी यांनी आपल्या अधिपत्याखालील गुन्हे शोध पथकांतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार करून आरोपींचा तात्काळ शोध घेणे व गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या.

**सदर गुन्ह्याचा तपास सुरू असताना गुन्हे शोध पथकाने गुप्त बातमीदारांकडून प्राप्त झालेली माहिती तसेच सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण यांच्या आधारे सदर चोरीच्या गुन्ह्यात सराईत आरोपी (१) शहीदखान नजीरखान, वय २७ वर्षे, रा. युसूफ मेडिकलजवळ, गेंदालाल मिल, जळगाव, (२) समीर खान मजीदखान, वय ३७ वर्षे, रा. बि. नं. १९, घर नं. १५, गेंदालाल मिल, जळगाव व (३) विधी संघर्षित बालक यांचा सहभाग असल्याची माहिती प्राप्त झाली.**

प्राप्त माहितीनुसार सदर आरोपींचा शोध घेत असताना ते **गेंदालाल मिल परिसरातील एका दुकानाजवळ असल्याची माहिती** गुन्हे शोध पथकास मिळाली. त्यानुसार पथकाने तत्काळ घटनास्थळी जाऊन शोध घेतला असता तिन्ही संशयित मिळून आले. त्यांना **ताब्यात** घेऊन सदर चोरीच्या गुन्ह्याबाबत चौकशी केली असता सुरुवातीस त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर पोलिसांनी **कौशल्यपूर्ण व सखोल चौकशी** केली असता त्यांनी सदर चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानुसार **दोन्ही** प्रौढ आरोपींना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली असून विधी संघर्षित बालकास कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर आरोपींकडून **१२,०००/- रुपये रोख रक्कम हस्तगत** करण्यात आली असून, चोरीचा गुन्हा **अवघ्या ५ तासांत उघडकीस आणण्यात** जळगाव शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकास यश आले आहे.

सदर कारवाई मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव परिमंडळ तसेच श्री. नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव उपविभाग, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सागर शिंपी, जळगांव शहर पोलीस स्टेशन यांच्या नेतृत्वाखाली GPSI/सुनिल पाटील, सफौ/दिपक शिरसाट, पोहेकॉ/नंदलाल पाटील, पोहेकॉ/भगवान पाटील, पोहेकॉ/उमेश भांडारकर, पोहेकॉ/सतिष पाटील, पोहेकॉ/विरेंद्र शिंदे, पोहेकॉ/योगेश पाटील, पोकॉ/अमोल ठाकुर, पोकॉ/राहुलकुमार पांचाळ, पोकॉ/प्रणय पवार व पोकॉ/भगवान मोरे यांचे पथकाने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे .


शहर पोलीस स्टेशन


पोलीस स्टेशन